सकाळ

# पारितोषिके दीक्षान्त सोहळ्यात

## व्यवस्थापन परिषद बैठक; पदवी-पदव्युत्तर प्रमाणपत्रे महाविद्यालयांतून

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. ४ : यंदापासून राष्ट्रपती सुवर्णपदक, पीएच.डी. प्रमाणपत्रे व विविध पारितोषिके शिवाजी विद्यापीठाच्या दीक्षान्त सोहळ्यात प्रदान करण्यात येणार आहेत. पदवी व पदव्युत्तर प्रमाणपत्रे विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयांत साजऱ्या होणाऱ्या 'ग्रॅज्युएशन डे'मध्ये दिली जाणार आहेत. त्याबाबत विद्या परिषदेने केलेली शिफारस व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत आज मान्य करण्यात आली. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली.

विद्यापीठाला काही दिवसांपूर्वी नवीन परिनियम प्राप्त झाले आहेत. त्यानुसार दीक्षान्त सोहळ्याचे आयोजन



करण्यासाठी विद्या परिषदेच्या बैठकीत 'ग्रॅज्युएशन डे' साजरा करण्याकरिता महाविद्यालयांसाठी मार्गदर्शक नियमावली तयार करावी, अशी चर्चा झाली. तसेच, नियमावली तयार करण्यासाठी समिती स्थापन करण्यात आली. विद्यापरिषदेने व्यवस्थापन परिषदेला नव्या परिनियमानुसार

> प्राचार्य खिलारी यांच्या नेतृत्वाखाली 'ग्रॅज्युएशन डे' मार्गदर्शक नियमावली तयार केली जात आहे. ती तयार झाल्यानंतर महाविद्यालयांना पाठविण्यात येणार आहे.
> - डॉ. विलास नांदिवडेकर, कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ

सोहळ्याचे आयोजन करण्याची शिफारस केली होती. त्यास मान्यता मिळाली.

२०१८-१९ करिता आर्थिकदृष्ट्या कमकुवत महाविद्यालय अर्थसाहाय्य योजनेंतर्गत अनुदान मिळण्याकरिता संलग्नित पारंपरिक महाविद्यालयांकडून विद्यापीठास सादर झालेल्या प्रस्तावाबाबत छाननी समितीने केलेल्या शिफारशी मान्य केल्या. वनस्पतीशास्त्र विभागात इनक्युबेशन ट्रेनिंग सेंटर सुरू करण्यास तत्त्वत: मान्यताही दिली. कऱ्हाड येथील सद्‌गुरू गाडगे महाराज महाविद्यालय व साताऱ्यातील छत्रपती शिवाजी महाविद्यालयाला दहा वर्षांच्या कालावधीसाठी स्वायत्तता दिल्याची नोंद घेण्यात आली. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा २०१६ नुसार विद्यार्थी निवडणुकांसंदर्भात निवडणूक प्रक्रिया सुलभ करण्यासाठी जागरुकता व प्रबोधनाचा कार्यक्रम राबविण्यास मान्यता देण्यात आली. या वेळी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदिवडेकर उपस्थित होते.

Kolhapur, Main
05/02/2019 Page No. 5

लोकमत

विद्यापरिषदेची शिफारस मान्य : शिवाजी विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेची बैठक

# महाविद्यालयातच यावर्षीपासून मिळणार पदवी प्रमाणपत्र!

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** महाविद्यालयात पदवी अथवा पदविका अभ्यासक्रमाचे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना त्यांचे पदवी प्रमाणपत्र त्या ठिकाणीच वितरित करण्याचा परिनियम नवीन विद्यापीठ कायद्यामध्ये आहे. याबाबत शिवाजी विद्यापीठाच्या विद्यापरिषदेने केलेली शिफारस सोमवारी व्यवस्थापन परिषदेने मान्य केली.

विद्यापीठ कार्यालयात कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली आणि प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांच्या उपस्थितीमध्ये व्यवस्थापन परिषदेची बैठक झाली. सदस्य सचिवपदी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर होते. नवीन विद्यापीठ कायद्यानुसार विद्यापीठाचा दीक्षान्त समारंभ झाल्यानंतर ३० दिवसांमध्ये महाविद्यालयातील पदवीधरांना त्यांची पदवी अथवा पदविका अभ्यासक्रमाचे प्रमाणपत्र महाविद्यालयातच वितरित करण्याचा परिनियम आहे. या परिनियमानुसार शिवाजी विद्यापीठाच्या यंदाच्या ५५ व्या दीक्षान्त समारंभापासून कार्यवाही करण्याबाबतची विद्या परिषदेने केलेली शिफारस व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत मान्य करण्यात आली.

या परिनियमानुसार कार्यवाही करण्याबाबत विद्यापीठाने समिती नेमली आहे. त्याच्या अंमलबजावणीबाबत अहवाल संबंधित समिती पुन्हा व्यवस्थापन परिषदेसमोर ठेवणार आहे. या परिषदेने अंतिम मान्यता दिल्यानंतर या परिनियमानुसार कार्यवाही होणार आहे. सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षासाठी आर्थिकदृष्ट्या कमकुवत महाविद्यालय अर्थसाहाय्य योजनेअंतर्गत अनुदानप्राप्त होण्यासाठी पारंपरिक महाविद्यालयांनी सादर केलेल्या प्रस्तावांबाबत छाननी समितीने केलेल्या शिफारशी मान्य करण्यात आल्या. वनस्पतीशास्त्र अधिविभागात इनक्युबेशन अ‍ॅण्ड ट्रेनिंग सेंटर सुरु करण्यास तत्वत: मान्यता देण्यात आली. विद्यापीठ अनुदान आयोगाने (युजीसी) सद्‌गुरू गाडगे महाराज कॉलेज (कऱ्हाड), छत्रपती शिवाजी कॉलेज (सातारा) यांना सन २०१९-२०२९ या कालावधीसाठी दिलेल्या स्वायत्ततेची नोंद घेण्यात आली. विद्यार्थी निवडणूक प्रक्रिया सुलभ करण्यासाठी जागरूकता, प्रबोधनाचा कार्यक्रम राबविण्यास मान्यता देण्यात आली.

## 'सुटा'कडून पुरावे मागवावेत



**कुलगुरु डॉ. शिंदे यांच्यावर केलेल्या आरोपांबाबतचे पुरावे शिवाजी विद्यापीठ शिक्षक संघाकडून (सुटा) मागविण्यात यावेत, अशी मागणी व्यवस्थापन परिषदेतील विद्यापीठ विकास आघाडीच्या सदस्यांनी या बैठकीत विद्यापीठ प्रशासनाकडे केली.**

पुढारी

# विद्यार्थी निवडणूक प्रक्रियेबाबत प्रबोधन

## व्यवस्थापन परिषद बैठकीत मान्यता

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे कायद्यानुसार विद्यार्थी निवडणुकांसंदर्भात निवडणूक प्रक्रिया सुलभ करण्यासाठी जागरूकता व प्रबोधन कार्यक्रम राबविण्यास शिवाजी विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत मान्यता देण्यात आली.

विद्यापीठ कार्यालयात व्यवस्थापन परिषदेची बैठक कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के आणि व्यवस्थापन परिषद सदस्य यांच्या प्रमुख उपस्थितीत झाली. सदस्य सचिव म्हणून कुलसचिव डॉ. व्ही. डी.नांदवडेकर यांनी कामकाज पाहिले. बैठकीत विविध विषयांवर निर्णय घेण्यात आले. शैक्षणिक वर्ष २०१८-१९ करिता आर्थिकदृष्ट्या कमकुवत महाविद्यालय अर्थसहाय्य योजनेंतर्गत अनुदान प्राप्त होण्याकरिता संलग्नित पारंपरिक महाविद्यालयांकडून विद्यापीठास सादर करण्यात आलेल्या प्रस्तावाबाबत छाननी समितीने केलेल्या शिफारसी मान्य करण्यात आल्या. ५५ व्या दीक्षांत समारंभात पदवी, पदविका प्रमाणपत्रे अभ्यासक्रमाची प्रमाणपत्रे प्रदान करण्याबाबत विद्यापरिषदेने केलली शिफारस मान्य करण्यात आली.



शिवाजी विद्यापीठातून...

वनस्पतिशास्त्र अधिविभागात इनक्युबेशन व ट्रेनिंग सेंटर सुरू करण्यास तत्त्वत: मान्यता देण्यात आली. विद्यापीठ अनुदान आयोगाचे सहसचिव यांच्या पत्राद्वारे सद्गुरू गाडगे महाराज कॉलेज कराड व छपत्रती शिवाजी कॉलेज सातारा या महाविद्यालयांना २०१९-२०, २०२८-२९ या दहा वर्षांच्या कालावधीसाठी स्वायत्तता दिल्याची नोंद घेण्यात आली.

## 'वृत्तपत्रविद्या'च्या क्रीडा स्पर्धेस प्रारंभ

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या वृत्तपत्रविद्या आणि संवादशास्त्र विभागाच्या वतीने वार्षिक क्रीडा स्पर्धेस सोमवारपासून प्रारंभ झाला. स्पर्धेचे उद्घाटन पत्रकार संजीव खाडे यांच्या हस्ते करण्यात आले. विद्यापीठाच्या टेक्नॉलॉजी विभागाच्या मैदानावर या क्रीडा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. दोन दिवस चाललेल्या या क्रीडा स्पर्धेत फुटबॉल, बुद्धिबळ, क्रिकेट, कॅरम, बॅडमिंटन अशा विविध क्रीडा स्पर्धा होणार आहेत. याप्रसंगी विभागप्रमुख डॉ. निशा मुढे-पवार, प्रा. डॉ. शिवाजीराव जाधव, प्रा. डॉ. सुमेधा घाटगे यांच्या हस्ते क्रीडा पत्रकारांचा सत्कार करण्यात आला. दिवसभर फुटबॉल स्पर्धा व बुद्धिबळ स्पर्धा संपन्न झाल्या.

# ‘मानसशास्त्र परिषद तरुणांसाठी उपयुक्त’

म. टा. वृत्तसेवा, इस्लामपूर

‘तरुणांमधील नैराश्य दूर करून आजच्या युवा पिढीत आत्मविश्वास निर्माण करण्यासाठी मानसशास्त्र परिषद उपयुक्त ठरेल,’ असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाच्या मानसशास्त्र विभाग प्रमुख प्रा. डॉ. भारती पाटील यांनी केले.

मालती वसंतदादा पाटील महाविद्यालय, सुश्रुषा सल्ला मार्गदर्शन केंद्र व शिवाजी विद्यापीठ मानसशास्त्र परिषद यांच्या वतीने पाचवे राज्यस्तरीय व तेरावे विद्यापीठस्तरीय अधिवेशन पार पडले. या वेळी त्या बोलत होत्या.

शिवाजी विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य ॲड. धैर्यशील पाटील म्हणाले, ‘युवा पिढीत व्यसनाधीनता, एकलकोंडेपणा, नैराश्य असे प्रश्न आहेत. आजच्या तरुणाईला मार्गदर्शन करण्यासाठी मानसशास्त्राच्या तज्ज्ञांनी पुढाकार घ्यावा. विद्यापीठाच्या वतीने मानसशास्त्र विभागास सर्व ते सहकार्य करू.’



भारती पाटील

ज्येष्ठ समाजसेविका रेणू गावस्कर म्हणाल्या, ‘आनंदी तरुणांनी समाज बांधणीसाठी उपयुक्त ठरेल.’ एकता निराधार संघाचे संस्थापक सागर रेड्डी, मानसतज्ज्ञ डॉ. संज्योत देशपांडे, डॉ. मनीषा व अभिजित सोनवणे यांनी तरुणाईशी संवाद साधला. शिवाजी विद्यापीठ मानसशास्त्र परिषदेचे अध्यक्ष डॉ. आर. के. आडसूळ यांनी परिषदेच्या कामाचा आढावा घेतला.

‘तरुणाई एक प्रश्नचिन्ह, युवा मन स्वास्थ्यासाठी मानस तज्ज्ञ व शिक्षक पालकांची भूमिका’ या विषयावर परिसंवाद झाला. मराठी मानसशास्त्र परिषदेचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. पुंडलिक रसाळ, प्रा. शिरीष शीतोळे, मानस तज्ज्ञ अजित पाटील, रश्मी पटवर्धन, माधुरी खैर यांनी संवाद साधला.

# ‘वनस्पतीशास्त्र’मध्ये इन्क्यूबेशन सेंटर

म. टा प्रतिनिधी, कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठातील वनस्पतीशास्त्र विभागात इन्क्यूबेशन व ट्रेनिंग सेंटर सुरू करण्यास शिवाजी विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. शिवाजी विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेची बैठक सोमवारी (ता. ४ फेब्रुवारी) झाली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे होते. प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांच्यासह सदस्य उपस्थित होते.

बैठकीत विद्यार्थी निवडणूक प्रक्रिया सुलभ करण्यासाठी जागृती अभियान राबवण्याच्या कार्यक्रमाचा विषय सादर करण्यात आला. त्यास मान्यता देण्यात आली. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या २८ डिसेंबर २०१८ रोजी देण्यात आलेल्या पत्रान्वये कराड येथील सद्गुरू गाडगे महाराज कॉलेज व सातारा येथील छत्रपती शिवाजी कॉलेज या महाविद्यालयांना २०१९ ते २०२९ या दहा वर्षांच्या कालावधीसाठी स्वायत्तता दिल्याची नोंद बैठकीत घेण्यात आली. २२ फेब्रुवारी रोजी आयोजित केलेल्या ५५ व्या दीक्षान्त सोहळ्यात पदवी व पदविका प्रमाणपत्रे प्रदान करण्याबाबत विद्या परिषदेने केलेल्या शिफारशी मान्य करण्यात आल्या.

# सायबरमध्ये ‘इडी’ सेलचे उद्घाटन

## पंतप्रधान मोदींच्या व्हीसीमध्ये विद्यार्थ्यांचा सहभाग

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

छत्रपती शाहू इन्स्टिट्यूट ऑफ बिझनेस एज्युकेशन अॅन्ड रिसर्चमध्ये ‘इंटरप्रिनिरशिप डेव्हलपमेंट सेल व स्कील हबचे उद्घाटन करण्यात आले. या एकाचवेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशाभरातील विद्यार्थ्यांशी व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे संवाद साधला.

राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान रुसा योजनेंतर्गत देशातील काही मोजक्या शिक्षण संस्थांना निधी प्राप्त झाला आहे. त्याअंतर्गत सायबर महाविद्यालयात उद्योजकता विकासासाठी लागणाऱ्या सोयी-सुविधा, मार्गदर्शन, ट्रेनिंग तसेच स्कील डेव्हलपमेंटसाठी लँग्वेज लॅब व मॅनेजमेंट लॅब आदींचा समावेश करण्यात आला आहे. अशाच प्रकारे रुसा २ अंतर्गत अनुदान प्राप्त झालेल्या सर्व संस्थांमध्ये डिजिटल लाँचिंगचा कार्यक्रम नॅशनल इन्फर्मेटिक सेंटरच्या माध्यमातून एकाचवेळी करण्यात आला. पंतप्रधान मोदी यांनी श्रीनगर येथून सर्वांशी संवाद साधला.



**कोल्हापूर : व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे पंतप्रधान मोदी यांचा संवाद ऐकताना मान्यवर आणि विद्यार्थी.**

यावेळी सायबर महाविद्यालयात झालेल्या कार्यक्रमामध्ये महाराष्ट्र राज्य उर्वरित विकास महामंडळाचे अध्यक्ष डॉ. योगेश जाधव आणि आ. अमल महाडिक यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. यावेळी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, शैक्षणिक सल्लागार डॉ. डी. आर. मोरे, प्रतिभा दक्षीत, डॉ. एस. जी. कुलकर्णी, डॉ. आर. ए. शिंदे, विश्वस्त डॉ. व्ही. एम. हिलगे, संचालक डॉ. एम. एम. अली, विशाखा आपटे, ऋषिकेश शिंदे आदींची प्रमुख उपस्थिती होती.